**प्रगत इंडो-पॅसिफिक लॉजिस्टिक नेटवर्क साठी क्वाड द्वारे सिम्युलेशन अभ्यासाचे आयोजन**

08 मे 2025

28 एप्रिल ते 2 मे दरम्यान क्वाड भागीदार (ऑस्ट्रेलिया, भारत, जपान आणि अमेरिका) हे हवाई स्थित होनोलुलू येथील आशिया-पॅसिफिक सेंटर फॉर सिक्युरिटी स्टडीज येथे टेबलटॉप अभ्यासासाठी एकत्रित आले होते. जे क्वाड इंडो-पॅसिफिक लॉजिस्टिक्स नेटवर्क (IPLN) लाँच करण्यासाठीचे एक प्रमुख सिम्युलेशन आहे. IPLN हा एक उपक्रम आहे जो क्वाड भागीदारांना इंडो-पॅसिफिकमध्ये सामायिक लॉजिस्टिक्स क्षमतांचा फायदा घेण्यास सक्षम करतो. जेणेकरून संपूर्ण प्रदेशात नैसर्गिक आपत्तींना नागरी प्रतिसाद अधिक जलद आणि कार्यक्षमतेने देता येईल.

2. सागरी क्षेत्र जागरुकतेसाठी इंडो-पॅसिफिक भागीदारीसह, IPLN हे मुक्त आणि खुले इंडो-पॅसिफिक सुनिश्चित करण्यासाठी क्वाडची वचनबद्धता प्रतिबिंबित करते आणि प्रादेशिक आव्हानांना तोंड देण्यासाठी व्यावहारिक सहकार्य मजबूत करण्याचे मूल्य अधोरेखित करते.

नवी दिल्ली

08 मे 2025